वर्ष- १० | अंक- ०१ | मुंबई, मंगळवार, २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२३ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 प्रदुषणविरोधी मोहिमेला जोर ९ दिवसांत ८४४५ वाहनांवर कारवाई

3 → भंगु दे काठिन्य त्यांचे..

डेली डाएटमधून इतक्या कॅलरी करा कमी... ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## केंद्रातील प्रतिनियुक्तीत राज्याचे बळ तोकडे; ९० जागा असताना सध्या २५ अधिकारीच केंद्रात




**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यांमधून केंद्रीय प्रतिनियुक्तीवर जाण्याचे प्रमाण कमी असल्याने केंद्र सरकारकडून चिंता व्यक्त केली जात असताना महाराष्ट्रातून केंद्रात प्रतिनियुक्तीचे खूपच कमी प्रमाण आहे. भारतीय प्रशासन सेवेतील (भाप्रसे) राज्यातील ९० अधिकारी प्रतिनियुक्तीवर जाणे अपेक्षित असताना सध्या केवळ २५ अधिकारीच केंद्राच्या सेवेत आहेत. राज्याच्या सेवेतील अपूर्व चंद्रा आणि राजेश अगरवाल हे दोन अधिकारी केंद्रात सचिवपदी आहेत. याशिवाय अतिरिक्त सचिव ४, सहसचिव ८, संचालक ५ आणि उपसचिव ६ असे अधिकारी केंद्रात आहेत.

अपूर्व चंद्रा हे माहिती आणि नभोवाणी तर राजेश अगरवाल हे ह्यदिव्यांगह्न मंत्रालयात सचिवपदी आहेत. राजीव जलोटा (१९८८) हे मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष आहेत. मिता लोचन (१९९०) राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्य सचिव, संजय सेठी (१९९२) जवाहरलाल नेहरू पोर्टचे अध्यक्ष, सुरेंद्र बागडे (१९९३) गृहनिर्माण व नागरी कार्य विभागात अतिरिक्त सचिव, संजीव कुमार (१९९३) भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे अध्यक्ष, व्ही. राधा (१९९४) उद्योग विकास आणि औद्योगिक व्यापार विभागात सहसचिवपदी आहेत.

कुणाल कुमार (१९९९) गृहनिर्माण व नागरी कार्य खात्यात सहसचिव, रिचा बागला (१९९९) आण्विक ऊर्जा विभागाचे सहसचिव, इंदिरा मालो (१९९९) महिला व बालविकास विभागात सहसचिव, पियुष सिंह (२०००) ऊर्जा विभागात सहसचिव, प्राजक्ता लवंगरे- वर्मा (२००१) वस्त्रोद्योग खात्यात सहसचिव, एम. शंकरनारायणन (२००३) आणिवक ऊर्जा विभागात वित्तिय सल्लागार, डॉ. निरुपमा डांगे (२००७) जणगणना विभागाच्या संचालक, संपदा मेहता (२००८) महसूल विभागात संचालक, नवल किशोर राम (२००८) पंतप्रधान कार्यालयात संचालक, रणजित कुमार (२००८) कार्मिक व प्रशिक्षण विभागाचे संचालक, ई. रविंद्रन (२००९) आण्विक ऊर्जा विभागाचे उपसचिव, शैलेश नवल ((२०१०) लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासकीय प्रशिक्षण केंद्राचे उपसंचालक, आशुतोष सलील (२०१०) पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्र्यांचे खासगी सचिव, सुमन चंद्रा (२०१०) अक्षय ऊर्जा विभागात उपसचिव, उदय चौधरी (२०१०) राज्यमंत्री कार्यालयात खासगी सचिव, राहुल द्विवेदी ( २०१०) आरईसी या नवरत्न कंपनीचे कार्यकारी संचालक, लक्ष्मीनारायण मिश्रा (२०१२) हे शालेय केंद्रीय राज्यमंत्री कार्यालयात खासगी सचिव म्हणून आहेत.

## ऑस्ट्रेलिया विश्वविजेते; ट्रॅव्हिस हेडची शतकी खेळी




**■मुंबई। प्रतिनिधी,**

आयसीसी एकदिवसीय विश्वचषक २०२३ चा अंतिम सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला गेला आहे. या सामन्यात भारत आणि ऑस्ट्रेलिया आमनेसामने आले होते. ऑस्ट्रेलियाने या सामन्यात भारताचा ६ गडी राखून पराभव केला. त्याचबरोबर विक्रमी सहाव्यादा एकदिवसीय विश्वचषकावर नाव कोरले. ऑस्ट्रेलियासाठी ट्रॅव्हिस हेडने शतक झळकवले.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय संघ प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत २४० धावांवर गारद झाला. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला विजयासाी २४१ धावांचे लक्ष्य मिळाले होते. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने ४३ षटकात ४ विकेट गमावत २४१ धावा करुन सामना जिंकला. कांगारू संघासाठी ट्रॅव्हिस हेडने १३७ धावांची मॅचविनिंग इनिंग खेळली. मार्नस लाबुशेनने नाबाद ५८ धावा केल्या. मिचेल मार्श १५ धावा केल्यानंतर, डेव्हिड वॉर्नर सात धावा करून, स्टीव्ह स्मिथ चार धावा करून बाद झाला. ग्लेन मॅक्सवेलने नाबाद २ धावा केल्या.

ऑस्ट्रेलिया सहाव्यांदा विश्वविजेता ठरला आहे. त्याचवेळी भारताचे तिसऱ्यांदा ट्रॉफी जिंकण्याचे स्वप्न भंगले. या स्पर्धेत सलग १० सामने जिंकले होते, मात्र ११व्या आणि अंतिम सामन्यात संघ मागे पडला. भारताला दुसऱ्यांदा ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या फायनलमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले आहे. या अगोदर रिकी पॉंटिंगच्या नेतृत्वाखालील संघाने २००३ मध्ये भारताचा पराभव केला होता.

तत्पूर्वी टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत सर्वबाद २४० धावा केल्या होत्या. भारताकडून केएल राहुलने सर्वाधिक ६६ धावांची तर विराट कोहलीने ५४ धावांची खेळी केली. याशिवाय कर्णधार रोहित शर्माने अवघ्या ३१ चेंडूत ४७ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्कने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. याशिवाय जोश हेझलवूड आणि पॅट कमिन्स यांना प्रत्येकी दोन विकेट्स मिळाल्या.

## मुंबई महानगरपालिकेचे 'के-पूर्व' विभाग कार्यालय तक्रारींची दखल घेत नसल्याने तक्रारदारांचे थेट मुख्यमंत्र्यांना पत्र

**■मुंबई। प्रतिनिधी,**

वाढती अनधिकृत बांधकामे, फेरीवाल्यांचा सुळसुळाट, अधूनमधून होणारा अपुरा पाणीपुरवठा, अस्वच्छता, आरोग्य सेवेतील त्रुटी आदी समस्यांमुळे अंधेरी पूर्व आणि आसपासच्या परिसरातील नागरिक त्रस्त असून या संदर्भात अनेक तक्रारी मुंबई महानगरपालिकेच्या के-पूर्व विभाग कार्यालयात करण्यात येत आहेत. मात्र काही तक्रारदारांवर 'व्यावसायिक तक्रारदार' म्हणून शिक्का मारून 'के-पूर्व' विभाग कार्यालयाने त्यांच्या तक्रारींची दखल घ्या, पण उत्तर वा सुनावणीस देण्यास बंधनकारक नसावे, असा फतवा परिपत्रकाद्वारे जारी केला आहे. मुंबई महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे याबाबत दाद मागूनही समाधानकारक उत्तर मिळत नसल्यामुळे या तक्रारदारांनी आता थेट मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून गाऱ्हाणे मांडले आहे. या विभागातील दोन खासदार, तीन आमदार आणि आता मुदत संपुष्टात आलेले १५ माजी नगरसेवक 'के-पूर्व' विभागात येऊन नागरिकांच्या समस्या मांडत असतात. त्याचबरोबर नागरी सुविधांतील त्रुटींबाबत नागरिकही मोठ्या संख्येन विभाग कार्यालयाकडे तकारी करीत असतात. काही नागरिक सातत्याने महानगरपालिकेच्या विविध विभागांतील त्रुटींवर बोट ठेवून



तक्रारी करीत असतात. मोठ्या संख्येने तक्रारी करणाऱ्या काही नागरिकांवर महानगरपालिकेने 'व्यावसायिक तक्रारदार' असा शिक्का मारला आहे. या व्यावसायिक तक्रारदारांच्या अर्जाची दखल घ्या, पण त्यांना उत्तर वा सुनावणी देण्यास बंधनकारक नसावे, असा फतवा 'के-पूर्व' विभागाने काढला आहे. 'के-पश्चिम' विभागाने 'व्यावसायिक तक्रारदार' म्हणून शिक्का मारलेल्यांमध्ये अजीज अमरेलिवाला, राजू राठोड, अनिता पाल, नितीन शाह आदींचा समावेश आहे. अमरेलीवाला यांनी 'के-पूर्व' विभागातील आरोग्य विभागाकडे १४, इमारत आणि कारखाने विभागाकडे १०१, परिरक्षण विभागाकडे १६, जल खात्याकडे आठ, अनुज्ञापन विभागाकडे १६ आणि अन्य विभागांकडे सात अशा एकूण १६२ तक्रारी केल्या आहेत. तसेच उर्वरित तिघांनी विविध विभागांकडे अनुक्रमे १४९, ८७ आणि ३२ तक्रारी केल्या आहेत. याविरोधात अमरेलिवाला यांनी मुंबई महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे दाद मागितली होती. ▪

## एसटीची १५ दिवसांत ३२८ कोटींची कमाई

**■मुंबई। प्रतिनिधी,**

गेल्या १५ दिवसांत राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) ३२८ कोटी ४० लाखांची कमाई केली आहे. दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये एसटी प्रवाशांच्या संख्येत मोठी वाढ नोंदविण्यात आली असून, हंगामी दरवाढीनंतरही प्रवाशांनी एसटीला पसंती दिल्याचे दिसते. कोरोनाचा प्रादुर्भाव आणि त्यानंतर एसटीच्या कर्मचाऱ्यांच्या राज्यव्यापी आंदोलनामुळे एसटीला मोठा आर्थिक फटका बसला होता.

काही दिवसांपूर्वी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी काही ठिकाणी एसटी गाडयांची तोडफोड, जाळपोळ करून सेवा खंडित केली होती. त्यामुळे सुमारे १७ हजारांहून बस फेऱ्या बंद होत्या. मात्र, एसटी प्रशासनाने महसूल वाढीसाठी परिवर्तनशील हंगामी भाडेवाढ सूत्रानुसार यंदाच्या दिवाळीच्या हंगामात सर्व गाडयांच्या तिकीट दरात सरसकट १० टक्के भाडेवाढ होती.

त्यानंतरही एसटी सेवेला चांगला प्रतिसाद मिळाला. १ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत एसटीला राज्यभरातून ३२८ कोटी ४० लाख रुपयांचा महसूल मिळाला. दिवाळीत बाहेरगावी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या अधिक होती. दिवाळीतील कमाईमुळे एसटीला मोठा दिलासा मिळाला आहे. भाऊबीजेला विक्रमी उत्पन्न बुधवारी भाऊबीजेच्या दिवशी एसटीला ३१ कोटी ६० लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळाले. गेल्या वर्षी २२ ऑक्टोबरला भाऊबीजेला एसटीला ३० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते, अशी माहिती एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.



## आश्रय ट्रस्ट च्या वतीने आदिवासी दुर्गम भागात गरीब बेरोजगार मुलांच्या सोबत दिवाळी केली साजरी



**■मुंबई। प्रतिनिधी,**

आश्रय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट चे मुख्य विश्वस्त (संस्थापक)श्री दीपक मोरेश्वर नाईक, संस्थापक सचिव, सौ.प्रीती दीपक नाईक, खजिनदार डॉक्टर अश्विनी नाईक, विश्वस्त तेजस्वी नाईक, विश्वस्त श्री. गुरुप्रसाद नाईक, सौ. कल्याणी नाईक, विश्वस्त श्री. विनोद मेढे इत्यादी सर्व ट्रस्ट मधील विश्वस्त तालुका वाडा येथील विविध आदिवासी पाड्यांवर जाऊन तेथील गरीब, गरजू व होतकरू तरुण, श्रिया याशिवाय अबाल बुद्धांना ट्रस्ट च्या संस्थापक सचिव सौ. प्रीती दीपक नाईक यांच्या हस्ते विविध प्रकारचे भेटवस्तू वितरित करण्यात आली याशिवाय ट्रस्टच्या मार्फत भोजनाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. याशिवाय विविध आदिवासी पाड्यांवरील उत्साही मुलांच्या मार्फत फटाके फोडण्याचा कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन ट्रस्ट चे सदस्य श्री एकनाथ राऊत यांनी अतिशय सुलभ रित्या केले होते. पालघर जिल्ह्यातील विशेषतः जव्हार वाडा आणि मोखाडा या अति दुर्गम भागातील विविध प्रकारच्या पाड्यांवर अशा स्वरूपाचे उपक्रम आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टमार्फत नेहमी राबवली जातात याशिवाय महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात सुद्धा आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टमार्फत विविध प्रकारचे उपक्रम नियमित राबविले जातात.











# पोलीस बातमी पत्र

मुंबई


✪ मुंबई, मंगळवार, २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२३




## आजोबा आणि नातू हे नातं जगात सगळ्यात स्पेशल
## बाळासाहेबांच्या स्मृतिदिनी आदित्य ठाकरेंची खास पोस्ट

**■मुंबई। प्रतिनिधी,**
दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतिदिन आहे. त्यांना अभिवादन करण्यासाठी राज्यभरातून शिवसैनिक शिवाजी पार्कवर दाखल झालेत. अभिवादनासाठी सकाळपासूनच शिवाजी पार्कवर रांगा लागल्या आहेत. तसेच अनेक राजकीय नेत्यांनी त्यांना सोशल मीडियाच्या माध्यमातूनही अभिवादन केलंय. शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या स्मृतिदनी खास पोस्ट करून बाळासाहेबांविषयीच्या आठवणी जागवल्या आहेत.

आजोबा आणि नातू हे नातं जगात सगळ्यात 'स्पेशल' असतं... त्यात आदर असतोच, पण मैत्री जास्त असते... धाक असतोच, पण प्रेम जास्त असतं... वयाचं अंतर असतंच, पण मन जवळ असतं.... आजोबा हा नातवाचा पहिला मित्र असतो... त्यापेक्षा घट्ट मित्र दुसरा कोणीही असू शकत नाही! मी भाग्यवान आहे की, जगासाठी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे' असलेला युगपुरूष माझा 'आज्या' आहे... बाळासाहेबांना स्मृतीदिनी विनम्र अभिवादन, अशी खास पोस्ट आदित्य ठाकरेंनी लिहिली आहे.



बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनाच्या निमित्तानं आज शिवाजी पार्कवर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आले आहेत. त्यांना अभिवादन करण्यासाठी दादर शिवाजी पार्क स्मृतीस्थळ सज्ज झालंय. शिवसेना ठाकरे गट आणि शिंदे गटाचे कार्यकर्ते या ठिकाणी अभिवादनासाठी येणार आहेत. यामुळे शिवाजी पार्कवर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतिदिन आज, शुक्रवारी असताना, शिवाजी पार्क येथील त्यांच्या स्मृतिस्थळी गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे कार्यकर्ते; तसेच उद्धव ठाकरे गटाचे कार्यकर्ते यांच्यात जोरदार संघर्ष उफाळून आला होता. शाब्दिक चकमकी, धक्काबुक्की असे प्रकार घडले. पोलिसांनी मोठ्या कष्टाने परिस्थिती आटोक्यात आणली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे एका कार्यक्रमानंतर दादरच्या शिवाजी पाकार्तील बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळी गेले. मुख्यमंत्र्यांनी या वेळी बाळासाहेबांना अभिवादन केले. ही माहिती मिळताच ठाकरे गटाचे कार्यकर्ते शिवाजी पार्कात आले.

त्या वेळी दोन्ही गटांत आधी जोरदार शाब्दिक चकमक उडाली. याच वेळी आमदार अनिल परब, खासदार अनिल देसाई आणि महेश पेडणेकरही स्मृतिस्थळावर आले. या वेळी 'गद्दारांना हाकलून द्या,'... अशा घोषणा देण्यात आल्या; तर शिंदे गटाकडून 'एकनाथ शिंदे अंगार है, बाकी सब भंगार है,' अशा घोषणा देण्यात आल्या.

## विश्वचषक क्रिकेट स्पर्धेवर सट्टेबाजी करणाऱ्याला अटक



**■पुणे। प्रतिनिधी,**
विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील भारत न्यूझीलंड उपांत्यफेरिच्या सामन्यावर सट्टा लावणाऱ्या एका सट्टेबाजाला नवघर पोलिसांनी अटक केली आहे.

त्याचा एक साथीदार फरार आहे. बुधवारी मुंबईत भारत आणि न्यूझीलंड दरम्यान एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचा उपांत्यफेरीचा सामना झाला. या सामन्यात मोठ्या प्रमाणावर सट्टेबाजी लावण्यात आली होती. असाच एक प्रकार भाईंदर मध्ये उघडकीस आला आहे. भाईंदर पुर्वेच्या साईबाबा नगर येथे हरिष तिवारी (४३) हा सामन्यावर सट्टेबाजी लावत होता. लोकांकडून पैसे घेऊन तो सट्टा लावत असताना आढळून आला.

याबाबत पोलिसांना माहिती मिळताच छापा टाकून त्याला अटक करण्यात आली. त्याच्यावर यापूर्वी सट्टेबाजीचे दोन गुन्हे दाखल आहेत. त्याच्या विरोधात नवघर पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायदा कलम १२(अ) सह मुंबई टेलिग्राम अ‍ॅक्ट १९८७ च्या कलम २५(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचा एक साथीदार फरार आहे.

## कोकण पदवीधर मतदारसंघासाठी मनसेची मोर्चेबांधणी

**■मुंबई। प्रतिनिधी,**
कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढविण्यासाठी राष्ट्रवादी, शिवसेना आणि भाजपकडून मोर्चेबांधणी सुरू असतानाच, त्यापाठोपाठ आता मनसेनेही हि निवडणूक लढविण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी ठाणे, पालघर जिल्ह्यातील पदाधिकारी, मनसे संलग्न संघटनेच्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यात या निवडणूक लढविण्याबाबत चर्चा केल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले. या निवडणुकीसाठी किती मतदान नोंदणी करण्यात आली, याचा आढावा घेऊन



या निवडणुकीबाबत त्यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केल्याचे सुत्रांनी सांगितले.

गेल्या काही दिवसांपासूनन सर्वच राजकीय पक्षांनी कोकण पदवीधर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली असून त्यासाठी पक्ष पदाधिकाऱ्यांकडून मतदार नोंदणी करण्यात येत आहे. आता या निवडणुकीच्या मैदानात मनसेही उतरणार आहे. काही दिवसांपुर्वी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी ठाण्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची मुंबईतील निवासस्थानी बैठक घेऊन त्यात या निवडणुकीबाबत चर्चा केली होती. त्यानंतर त्यांनी राज ठाकरे यांनी गुरूवारी ठाण्यात पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. मनसेच्या नौपाडा येथील मध्यवर्ती कार्यालयात ही बैठक पार पडली. या बैठकीला मनसे नेते अभिजीत पाचंगे, ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव, मनविसेचे सरचिटणीस संदीप पाचंगे यांच्यासह ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून कोकण पदवीधर निवडणूक लढविण्याबाबतचा आढावा घेतला. या निवडणुकीसाठी पक्षाकडून किती मतदार नोंदणी करण्यात आली आहे, याचाही आढावा त्यांनी घेतला. ही निवडणूक कशा पध्दतीने लढविली पाहिजे आणि या निवडणुकीत कशाप्रकारे मतदान करण्यात येते. मतदारांना त्या दृष्टीने कसे जागरुक करावे, याबाबत त्यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

ठाण्यात शिंदेची शिवसेना, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी (शरद पवार गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि भाजप या पक्षांकडून पदवीधर निवडणूक लढविण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू असतानाच, आता या निवडणुकीच्या रिंगणात मनसेही उतरणार आहे, अशी माहिती सुत्रांनी दिली.

## ठाण्यात वाढत्या प्रदुषणाच्या पार्श्वभूमीवर पीयूसी तपासणी मोहिम
## ८२ वाहनचालकांकडून ८३ हजार रुपयांचा दंड वसूल




**■मुंबई। प्रतिनिधी,**
मुंबई महानगरात हवा प्रदुषणात वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाने प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) तपासणी मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेत २३ पीयूसी केंद्रांसह ५६८ वाहनांची तपासणी करण्यात आली असून त्यात दोषी आढळून आलेल्या ८२ वाहनचालकांकडून ८३ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. ही कारवाई यापुढेही सुरूच राहील असे प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.मुंबई उपनगरात हवा प्रदूषणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे. हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहे. त्यानुसार ठाणे महापालिका आणि पोलिसांकडून दिवाळी नियमांचे उल्लंघन करून फटाके फोडणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात येत आहे. त्यापाठोपाठ वाहनातील उत्सर्जित धुरावाटे होणाऱ्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी ठाणे प्रादेशिक परिवहन विभाग सतर्क झाला आहे. ठाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी रवी गायकवाड, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील यांनी पीयूसी प्रमाणपत्र नसलेल्या वाहनांची तपासणी मोहीम सुरू केली आहे. गेल्या आठ दिवसांपासून ही मोहिम सुरू आहे. त्यात २३ पीयूसी केंद्रांची तपासणी करण्यात आली असून यात एकही केंद्र दोषी आढळून आले नाही. त्याचबरोबर ५६८ वाहनांची तपासणी करण्यात आली असून यात ८२ वाहने दोषी आढळून आली आहेत. या वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करून त्यांच्याकडून ८३ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

## ठाण्यातील अंतर्गत रस्ते, पुलांची यंत्र वाहनाद्वारे होणार सफाई?
## चार यंत्र वाहने खरेदी करण्याचा पालिकेचा विचार




**■मुंबई। प्रतिनिधी,**
शहरातील मुख्य रस्त्यांची भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या दोन यंत्र वाहनांद्वारे दररोज सफाई करण्यात येत असून यामुळे रस्ते सफाई कामाचा दर्जा वाढत असल्याचा दावा करत ठाणे महापालिका प्रशासनाने आता अशी चार वाहने खरेदी करण्याचा विचार सुरू केला आहे. चारपैकी एक मोठे आणि तीन लहान यंत्र वाहने खरेदी करून त्याद्वारे शहरातील अंतर्गत मुख्य रस्ते आणि उड्डाण पुलाची सफाई करण्याचा पालिका प्रशासनाचा विचार आहे, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली.

ठाणे महापालिका क्षेत्रातील रस्त्यांची मानवी पद्धतीने सफाई करण्यात येते. अनेक रस्त्यांची योग्यप्रकारे सफाई होत नसल्याची टिका नागरिकांकडून सातत्याने होत आहे. हि बाब ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्याही निदर्शनास आली होती. यानंतर त्यांनी ठेकेदारांना रस्ते सफाईच्या कामाचा दर्जा सुधारण्याचे आदेश दिले होते. परंतु वारंवार सुचना देऊनही कामात सुधारणा होत नसल्यामुळे त्यांनी काही ठेकेदारांना नोटीसा बजावल्या होत्या. अखेर यांत्रिक पद्धतीने रस्ते सफाई करण्याचा निर्णय आयुक्त बांगर यांनी घेतला होता.

यानुसार दोन यंत्र वाहने पालिकेने भाडे तत्वावर घेतली आहेत. गेल्या पाच महिन्यांपासून या वाहनांद्वारे शहरातील मुख्य रस्ते तसेच पूर्व द्रुतगती महामार्गावरील रस्त्यांची सफाई करण्यात येत आहे. एक वाहन दिवसभरात सुमारे ४० किमी रस्त्यांची सफाई करीत असून त्याचबरोबर मोठ्या रस्त्यांची सफाई जलदगतीने होत आहे. रस्त्यावरील कचरा, रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर साठणारी धूळ काढण्याचे काम ही वाहने करतात. दोन्ही वाहनांद्वारे महिन्याला १५० ते २०० टन कचरा काढण्यात येतो. रस्ते सफाई कामाचा दर्जा वाढत असल्याचा दावा करत ठाणे महापालिका प्रशासनाने आता अशी चार वाहने खरेदी करण्याचा विचार सुरू केला आहे. चारपैकी एक मोठे आणि तीन लहान यंत्र वाहने खरेदीचा विचार असून ही सर्व वाहने अत्याधुनिक असणार आहेत. शहरातील अंतर्गत मुख्य रस्त्यांची आणि पुलाची सफाई व्हावी, या दृष्टीने ही वाहने खरेदी करण्याचा विचार प्रशासनाकडून सुरू आहे. मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे या मोहिमेत ठाणे महापालिका क्षेत्रात रस्ते, शौचालये, स्वच्छता आणि सुशोभीकरण अशी कामे सुरू आहेत. याच मोहिमेतंर्गत ठाण्यातील रस्त्यांची सफाईसाठी हि वाहने खरेदी करण्याचा विचार आहे.

## नालासोपाऱ्यात पित्याचे राक्षसी कृत्य उघड, मुलीवर बलात्कार आणि मारहाण, मुलीचा मृत्यू

**■मुंबई। प्रतिनिधी,**
नालासोपार्यात एका पित्याकडून स्वतःच्या २२ वर्षीय मुलीवर शारिरीक अत्याचार होत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. आरोपी पिता या मुलीला घरात डांबून सतत तिला मारहाण करून बलात्कार करत होता. पीडित मुलगी क्षयरोगाने आजारी असतानाही हे अत्याचार सुरू होते. मुलीच्या मृत्यूनंतर तिच्या आईने धाडस करून पोलिसांत तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पीडित तरुणी ही २२ वर्षांची असून ती नालासोपारा पश्चिम येथे रहात होती. मागील ३ महिन्यांपासून ती क्षयरोगाने आजारी होती. तिला ११ नोव्हेंबर रोजी मुंबईच्या जेजे रुग्णालयातील अतिदक्षता विभागात



उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. परंतु उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. तिच्या मृत्यूनंतर मात्र तिच्यावरील अत्याचाराला वाचा फुटली आहे. पीडित मुलीचे ५४ वर्षीय वडीलच तिच्यावर बलात्कार करून शारिरीक छळ करत असल्याची तक्रार तिच्या आईने नालासोपारा पोलिसांत दिली आहे.

पीडित मुलीवर सतत तिचे वडील बलात्कार करत होते. या प्रकाराची कुठे वाच्यता केल्यास ठार मारण्याची धमकी देत होते. मुलीला तो बळजबरीने घरात डांबून ठेवत होता. त्यामुळे पीडित आणि तिची आई भीतीपोटी गप्प रहात होते. हे प्रकार सातत्याने वाढत होते. आरोपी पिता मुलीला मारहाण करत होता. या काळात मुलगी गर्भवती झाली होती. त्यावेळी तिचा आरोपी पित्याने बळजबरीने गर्भपातही केला होता.

दरम्यान, पीडित तरुणीला क्षयरोगाची लागण झाल्यानंतरही पित्याचे अत्याचार सुरू होते. मुलीच्या मृत्यूनंतर आईने पोलिसात तक्रार करण्याचे धाडस दाखवले. तिच्या आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी पित्याविरोधात कलम ३७६(एन), ३५४ (अ) तसते ३४२, ३२२, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पित्याच्या मारहाण आणि शारिरीक अत्याचारामुळेच मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या आईने केला आहे. प्रथमदर्शनी पीडित मुलीचा मृत्यू हा क्षयरोगाने झाला असल्याची माहिती रुग्णालयाकडून मिळाली आहे. मात्र तिच्या आईने दिलेल्या फियार्दीवरून तिच्यावर बलात्कार करणे, विनयभंग करणे, गर्भपात करणे, डांबून ठेवणे आदी तक्रारीनुसार पीडित मुलीच्या पित्यावर विविध कलमाअन्वये गुन्हे दाखल केले आहेत. आरोपी पित्याला अटक करण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती नालासोपारा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कदम यांनी दिली.

## प्रदुषणविरोधी मोहिमेला जोर
## ९ दिवसांत ८४४५ वाहनांवर कारवाई

**■मुंबई। प्रतिनिधी,**
मुंबईतील वाढत्या प्रदुषणामुळे मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेनेही उपाययोजना करण्यास सुरूवात केली आहे. त्याअंतर्गत वाहतूक पोलिसांनी गेल्या ९ दिवसांत वायू प्रदुषणाच्या नियमांचा भंग केल्याप्रकरणी ८,४४५ कारवाया केल्या आहेत. या विशेष मोहिमेअंतर्गत अनधिकृत सायलन्सरची निर्मिती करणाऱ्यांवरही कारवाई करणार असल्याची माहिती सहपोलीस आयुक्त (वाहतूक) प्रवीण पडवळ यांनी दिली. वाहतूक पोलीस पीयूसी प्रमाणपत्र नसलेल्या वाहनांविरोधात ७ नोव्हेंबरपासून कारवाईला सुरूवात केली आहे. तसेच राडारोड्याची वाहतूक करताना नियमभंग करून धूळ उडवणाऱ्या वाहनांवरही कारवाई करणास सांगण्यात आले होते. जुन्या व्यावसायिक वाहनांना सीएनजी किट बनवणे बंधनकारक असतानाही अनेक वाहनचालक तसे करणे टाळतात. अशा वाहनावरही दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. तसेच दुचाकी, मोटरगाडीचा सायलन्सर कापलेल्या वाहनांवरही कारवाई करण्याचे आदेश सर्व चौक्यांना देण्यात आले होते. या आदेशानंतर वाहतूक पोलिसांनी वायू प्रदुषणाबाबतच्या नियमांचा भंग केल्याप्रकरणी ८,४४५ कारवाया केल्या आहेत. त्यात पीयूसी प्रमाणपत्र नसल्याप्रकरणी वाहतूक पोलिसांनी ५,८६६ कारवाया केल्या आहेत. वाहनांच्या सायलेन्सरमध्ये अनधिकृत बदल केल्याप्रकरणी ८४१ वाहनांवर



कारवाई करण्यात आली. यावेळी ५८४ सायलेन्सर वाहतूक पोलिसंनी जप्त केले. त्यांच्यावर बुलडोझर चालवण्यात आले आहेत. राडारोडा अथवा मालाची धोकादायक वाहतूक केल्याप्रकरणी १,७३८ वाहनांवर कारवाई करण्यात आली. या संपूर्ण मोहिमेअंतर्गत १३ लाख ७५ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. अनधिकृत सायलन्सर वायू व ध्वनी प्रदुषणाला कारणीभूत ठरतात. त्यामुळे अशा सायलन्सरची निर्मिती करणाऱ्यांविरोधातही पोलीस कारवाई करणार आहेत. गेल्या ९ दिवसांपासून वाहतूक पोलिसांनी वायू प्रदुषणाच्या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. त्याअंतर्गत ९ नोव्हेंबरला वाहतूक पोलिसांनी सर्वाधिक कारवाया केल्या. गुरूवारी पीयूसी नसलेल्या १,०२८ वाहनांवर कारवाई करण्यात आली. वर्षभरात पीयूसीबाबत २० हजार ९४६ कारवाया वाहतूक पोलिसांनी केल्या आहेत. तसेच अनधिकृत सायलेन्सरबाबत २१६ कारवाया एका दिवसात करण्यात आल्या.

## रिक्षाचालकाची महिला प्रवाशांसोबत बेशिस्त वर्तवणूक वाहतूक परवाना झाला रद्द, दंडही ठोठावला

**■पनवेल। प्रतिनिधी,**
महिला प्रवाशांसोबत बेशिस्त वर्तवणूक, भाडे नाकारणे, मीटरप्रमाणे भाडे आकारणे आणि वाहतूक नियमांचा उल्लंघन करणे एका रिक्षा चालकाच्या चांगलेच अंगलट आले आहे. दिनेश फडके असे या रिक्षा चालकाचे नाव असून पनवेल आरटीओने त्याचा वाहतूक परवाना रद्द करताना २२ हजाराचा दंड ठोठावला आहे. पनवेलजवळील पळस्पे फाटा



येथील मॅरेथॉन या सोसायटीच्या गेट समोरील रिक्षा थांब्यावर महिलांसोबत गैरवर्तणूक होत असल्याची ओरड होत होती. या सोसायटीतील एका महिलेने याबाबतची तक्रार दिल्यानंतर एमएच ४६ बीडी ७४७६ या रिक्षावरील रिक्षाचालक दिनेश फडके हा महिलांशी उद्धट वर्तन, मनमानी भाडे आकारणी करणे व दमदाटी करीत असल्याची तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीनंतर पनवेल परिवहन कार्यालयाने रिक्षा चालकाला नोटीस बजावून कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते. मात्र, कारवाईच्या भीतीने पळून गेला होता. अखेर ७ नोव्हेंबरला प्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन ठोंबरे व नीलेश धोटे यांच्या पथकातील मोटर वाहन निरीक्षक संजय पाटील व विजया चामे यांनी या रिक्षाचालकाला पकडले. यावेळी चालकाकडे रिक्षा वाहनाचा विमा, वैधता प्रमाणपत्र तसेच परवानाही संपल्याचे उघडकीस आले. त्यामुळे पनवेल आरटीओने फडके याला दंड ठोठावत कारवाई केली आहे.

## मोबाईलवर गेम खेळण्यासाठी पालकांनी मनाई केल्यावर मुलाने संपविले जीवन

**■मुंबई। प्रतिनिधी,**
वडिलांनी मोबाईलवर गेम खेळू न दिल्याने १६ वर्षांच्या मुलाने शुक्रवारी मुंबईत आपले जीवन संपविल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पोलिसांना शुक्रवारी अटलांटा एका किशोरवयीन मुलाची माहिती मिळाली होती. पोलिसांनी रुग्णालयात पोहोचून मुलाच्या वडिलांचे जबाब नोंदवले. वडिलांनी दिलेल्या माहितीनुसार मुलाला मोबाईलवर गेम खेळण्याचे व्यसन होते. अनेक वेळा त्याच्या वडिलांनी त्याला जास्त वेळ खेळ न खेळण्याचा इशारा दिला. परंतु मुलाने वडिलांना न जुमानता गेम खेळायला सुरुवात केली. पुन्हा वडिलांनी मुलाला चेतावणी दिली. परंतु मुलाने त्यावर मोबाईल खेळायला न दिल्यास स्वतःला हानी पोहोचवण्याची धमकी दिली. गुरुवारी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास वडिलांनी मुलाचा मोबाईल हिसकावून घेत त्याला झोपायला सांगितले, त्यामुळे मुलगा नाराज झाला. कुटुंब नंतर झोपायला गेले. शुक्रवारी, सकाळी १०.३० च्या सुमारास, जेव्हा मुलाचे वडील जागे झाले तेव्हा त्यांना त्यांचा मुलगा स्वयंपाकघरात गळफास घेतल्याचे दिसले. आपला मुलगा जिवंत आहे या आशेने, त्या व्यक्तीने मुलाला अटलांटा रुग्णालयात नेले. जिथे वैद्यकीय अधिकाऱ्याने त्याला मृत घोषित केले. मालवणी पोलिसांनी या प्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद केली असून पोलीस पोस्टमार्टम रिपोर्टची वाट पाहत आहेत.

## संपादकीय...

# आरक्षणाचा हरियाणाचा धडा



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

खासगी क्षेत्रातील नोक यांमध्ये ७५ टक्के आरक्षण राज्यातील युवकांना लागू करण्याची तरतूद असलेला हरियाणा सरकारचा कायदा पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविला. यापूर्वी आंध्र प्रदेश आणि झारखंड या दोन राज्यांनी अशीच तरतूद असलेला कायदा केला होता. आंध्र प्रदेशचा कायदा घटनाबाह्य असल्याचे निरीक्षण तेथील उच्च न्यायालयाने नोंदविले होते. झारखंड सरकारनेही स्थानिक युवकांना खासगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्याच्या केलेल्या कायद्याला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने १९८४ मध्ये एका खटल्यात जन्म आणि रहिवासाच्या आधारे आरक्षण ठेवण्याच्या विरोधात भूमिका घेतली होती. असे आरक्षण घटनाबाह्य असल्याचा निवाळा दिला होता, पण कोणतीही बंधने घातली नव्हती. तेलुगू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना पाच टक्के आरक्षण ठेवण्याचा आंध्र प्रदेश सरकारचा निर्णय १९९५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविला होता. शिक्षकभरतीत जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्याचा राजस्थान सरकारचा निर्णयही सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरविला होता. म्हणजेच सर्वोच्च न्यायालयाने रहिवास, जन्म किंवा स्थानिक म्हणून जागा राखीव ठेवण्याची कृती बेकायदा ठरवली होती. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने आता अशाच आरक्षणावरून हरियाणामधील भाजप आणि दुष्यंत चौटाला यांच्या जननायक जनता पार्टीच्या सरकारचे कान टोचले आहेत. महाराष्ट्रातही उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत असताना खासगी क्षेत्रांमधील ८० टक्के जागा राज्यातील युवकांना राखीव ठेवण्याचा कायदा करण्याचे प्रस्तावित होते, पण सरकारच गडगडले. तमिळनाडू आणि मध्य प्रदेशातही स्थानिकांना खासगी क्षेत्रातील रोजगारात आरक्षण ठेवण्याची घोषणा झाली होती, पण प्रत्यक्षात येऊ शकलेली नाही.

खर्चात झालेली वारेमाप वाढ आणि वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) प्रणाली लागू झाल्यापासून देशातील बहुतेक सर्वच राज्ये आर्थिकदृष्ट्या कमकुवत झाली आहेत. अशा वेळी सरकारी नोकरभरती करून वेतनखर्च वाढविणे राज्यांना शक्य होत नाही. दुसरीकडे रोजगाराच्या संधी घटल्या आहेत. तरुण वगार्ला नाराज करणे कोणत्याही राजकीय पक्षाला शक्य नसते. मग राजकीय फायद्यासाठी प्रादेशिक अस्मितेचा मुद्दा राजकीय पक्षांना उपयुक्त ठरतो. प्रादेशिक अस्मितेला हात घातल्यावर एक वर्ग खूश होतो. मराठीच्या मुद्द्यावरच शिवसेनेने वर्षानुवर्षे मुंबईवर अधिराज्य गाजविले. परराज्यातून येणा या लोंढयाचा मुद्दा आधी शिवसेना व नंतर मनसेने तापविला. मतांचे गणित जुळविण्याकरिता प्रादेशिक अस्मिता कामाला येते. त्यातूनच हरियाणा, आंध्र प्रदेश आणि झारखंड या तीन राज्यांनी स्थानिक युवकांना खासगी नोक यांमध्ये आरक्षण ठेवण्याचा कायदा केला. असा कायदा केल्याने स्थानिकांची मने आणि मते जिंकणे सत्ताधा यांना फायदेशीर ठरते.

एखादा कायदा कायद्याच्या कसोटीवर टिकणे कठीण असल्याची पूर्वकल्पना असूनही केवळ मतांसाठी असे कायदे केले जातात. त्याची अनेक उदाहरणे देता येतील. रहिवासावरून आरक्षण देता येणार नाही हे सर्वोच्च न्यायालयाने दोन दशकांपूर्वी स्पष्ट करूनही तीन राज्यांनी कायदे केलेच. राज्यातील मराठा आरक्षणाचे उदाहरणही असेच आहे. आरक्षणाची कमाल मयार्दा शिथिल केल्याशिवाय मराठा आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकणे अवघड असल्याची राज्यकर्त्यांना पुरेपूर कल्पना असूनही काँग्रेस आणि भाजप सरकारने केलेला कायदा न्यायालयांमध्ये टिकला नव्हता. तरीही महायुती सरकारच्या काळात पुन्हा मराठा आरक्षणाचा कायदा करण्याचे घाटत आहे. खासगी क्षेत्रात सरकारने नाक खुपसणे आणि खासगी कारखानदारावर सक्ती करणे हे केव्हाही चुकीचेच. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य असावे, असे धोरण राज्य सरकार करू शकते. पण अमुक टक्के जागांवर स्थानिकांचीच भरती करण्याची कायदेशीर सक्ती घटनाबा ठरणारच. हरियाणात या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून नोकरभरती रोडावली होती. शेवटी कारखानदाराला कुशल कामगार हवा असतो.

# विक्रमी विराटचे वैश्विकत्व !



**विराटच्या शतकी प्रवासापेक्षाही अद्भुत आणि सुंदर आहे, त्याने केलेला व्यक्तिमत्त्वातील बदल. तो करताना कुठेही त्याचे क्रिकेटप्रेम किंवा तंदुरुस्तीविषयीची उत्कटता पातळ झालेली नाही...**

भारतीय क्रिकेटच्या पंढरीत, क्रिकेटच्या आद्य नायकांसमोर विराट कोहलीने एकदिवसीय शतकांचे विक्रमी अर्धशतकी शिखर सर केले. असा योग फार थोडयांच्या नशिबी येतो. विराटचे विक्रमी पन्नासावे शतक विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात झळकणे हे तर अधिकच अभूतपूर्व. वैयक्तिक विक्रम आणि सांघिक कामगिरी यांचा मेळ सहसा साधला जात नाही. विराट कोहलीच्या बाबतीत तोही योग जुळून आला. यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत उपांत्य फेरीपर्यंतच्या दहा सामन्यांमध्ये दोन अपवाद वगळता उर्वरित सामन्यांत विराटने पन्नास धावांच्या पलीकडे मजल मारलेली आहे. यात दोन शतकांचाही समावेश आहे. आणखी किमान दोन सामन्यांत तो शतकाच्या आसपास येऊन बाद झाला. शतकासमीप आल्यावर विक्रमासाठी सावधपणे खेळू लागतो, असा आरोप विराटवर समाजमाध्यमांवर झाला. तो करणाऱ्या बहुतेकांना भावनिक लाटेवर आरूढ होणे अंगवळणी पडलेले असते आणि बुद्धी नामे आदिम मानवी गुणाचा विसर पडलेला असतो.

विराटची ५० पैकी २७ शतके लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करताना नोंदली गेली आहेत, हे यांच्या गावीही नसते. हा हिशोब केवळ लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करतानाच्या शतकांचा आहे. शतकाच्या आधारावर यशस्वी लक्ष्य उभारणीची उदाहरणेही विराटच्या बाबतीत डझनावरी सापडतील. तो स्वार्थी आहे, असे अलीकडेच एका ज्येष्ठ निवृत्त क्रिकेटपटूने सांगितले. सांघिक खेळात स्वार्थ साधूनच संघाची कामगिरी उंचावता येते. गोलंदाजाने बळी मिळवणे आणि फलंदाजाने धावा काढणे यात मुळातच स्वार्थी हेतू गृहीत धरलेला असतो. धावा न काढणारा फलंदाज किंवा बळी न घेणारा गोलंदाज राष्ट्रीय संघात सोडा, पण क्लब किंवा गल्ली संघातही टिकून राहणे अशक्यच. विराट कोहली किंवा त्याच्या आधी सचिन तेंडुलकर यांच्या शतकांच्या राशींचे अवलोकन करताना, या शतकांच्या अनुपस्थितीत भारताची यशोगाथा कशी काय साधली गेली असती याचा विचार व्हायलाच हवा. एखाद्यावर सरसकट ह्यस्वार्थीह्ण असा शिक्का मारताना, त्याच्या त्या टप्प्यापर्यंतच्या खडतर प्रवासाचे विस्मरण होते. सचिनही स्वाथार्साठी खेळतो, असा आरोप झालाच. सचिनचे शतक म्हणजे भारत हरणार, असे एक बिनडोकी विधान प्रसृत करण्यात मराठी जनच पुढे असायचे.

पण सचिनच्या शतकांनी भारतीय क्रिकेट संघाला स्थैर्य आणि आत्मविश्वास दिला. आणि तरीही सचिनच्या १०० शतकांपैकी (४९ एकदिवसीय अधिक ५१ कसोटी) कित्येक खेळींमुळे भारताला विजय साकारता आला किंवा पराभव टाळता आला. सचिनला गुरुस्थानी मानणाऱ्या देशातील असंख्य क्रिकेटपटूंमध्ये विराटही आहे. परंतु सचिनकडून प्रेरणा घेताना 'सचिनसारखाच' बनण्याचा प्रयत्न त्याने कधीही केला नाही, हे त्याचे निःसंशय यश. एरवी दैवताच्या भक्तिरसामध्ये आकंठ बुडणाऱ्यांचा हा देश. कित्येकांना अशा डुबक्यांतून बौद्धिक मांद्य येते आणि त्यांची स्वतःची अशी ओळख कधीही निर्माण होऊ शकत नाही. विराटने हे कटाक्षाने टाळले. सचिनरूपी आदशार्चा आदर करताना, विराटने स्वतःचा स्वतंत्र असा मार्ग चोखाळला. त्यातून जे रसायन घडले, त्याचा खुद्द सचिनलाही हेवा वाटतो, हेही विराटचे यशच.

वानखेडेवर विराटच्या परवाच्या अर्धशतकी खेळीचे साक्षीदार दस्तुरखुद्द व्हिव्हियन रिचर्डसही होते. ते तर आद्य एकदिवसीय फलंदाज. सचिन आणि रिचर्डस हे दोघेही विराटच्या विक्रमाचे साक्षीदार असणे हाही विलक्षण योगायोग. कारण विराटच्या फलंदाजीत सचिनची निर्दोष तंत्रशुद्धता आणि रिचर्डस यांचा गुर्मीसदृश आत्मविश्वास यांचा अभूतपूर्व मिलाफ दिसून येतो. ज्यांच्या निव्वळ मैदानावरील आगमनाने जगभरातील क्रिकेट मैदानांमध्ये प्रेक्षक आदराने उठून उभे राहतात असे हे तीन फलंदाज. हा मान इतिहासात बहुधा केवळ सर डॉन ब्रॅडमन यांनाच लाभला असावा. एकदिवसीय क्रिकेटमध्ये निर्णायकता असल्यामुळेच कसोटी क्रिकेटपेक्षाही ते अधिक लोकप्रिय झाले. बराच काळ क्रिकेटमधील जगज्जेता ठरवण्याचे ते एकमेव परिमाण मानले गेले.

अशा या क्रिकेटमध्ये लक्ष्याचा पाठलाग करणे ही सर्वाधिक आव्हानात्मक बाब असते. विराट कोहली या कलेत निपुणोत्तम. हे केवळ फलंदाजीतील तंत्रशुद्धतेने साधत नाही. त्यासाठी एकाग्रता, हिंमत आणि चतुराईदेखील लागते. त्यापेक्षाही मोठी महत्त्वाकांक्षा लागते. रिचर्डस आणि सचिन यांच्यासाठी क्रिकेट हा निव्वळ खेळ होता. सचिनसाठी त्याच्या जोडीला कोटयवधी क्रिकेटरसिकांच्या आशा असायच्या. तरीही त्याला परिस्थितीनुरूप खेळ करावा लागला. विराटने परिस्थिती निवडली आणि तिला वाटेल तेव्हा आणि तशी बदलण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली. नव्वदच्या दशकातला सचिन, नवीन शतकातला सचिन यांच्यात बदल होत गेले. पण बदलांचा कालखंड मोठा होता. विराटच्या बाबतीत हे बदल चटकन होत गेले, एखाद्या मोटारीने झटपट गियर बदलावे तसे. सचिन कोणत्याही परिस्थितीला स्थिरचित्त एकाग्रतेने आणि शालीनतेने सामोरा गेला. विराटला सुरुवातीला तशी गरज वाटली नाही.

याचे कारण सचिनचा उदय झाला त्या काळात भारतीय संघ संक्रमणावस्थेत होता. सुनील गावस्कर निवृत्त झाले होते नि कपिलदेव यांच्या कारकीर्दीचा उत्तरार्ध सुरू झाला होता. त्या तुलनेत विराटचे पदार्पण स्थिर आणि विजयी संघात झाले. परंतु सचिन आणि तत्कालीन कर्णधार महेंद्रसिंह धोनी यांच्या व्यक्तिमत्त्वांचा त्याच्यावर हळूहळू प्रभाव पडत गेला. हे बदल स्वीकारण्याचा परिपक्वपणा विराटने दाखवला, हे उल्लेखनीय.

# बुद्धिप्रामाण्यवादी, सडेतोड प्रबोधनकार

२० नोव्हेंबर २०२३ रोजी प्रबोधनकार ठाकरे यांचा पन्नासावा स्मृतिदिन. १७ सप्टेंबर १८८५ रोजी पनवेल येथे त्यांचा जन्म झाला. आणि २० नोव्हेंबर १९७३ रोजी ते मुंबईत कालवश झाले. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पनवेल व देवास येथे झाले. मराठी व इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे हे महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीतील एक अग्रेसर नाव आहे. आपल्या सात दशकांच्या सामाजिक, वैचारिक जीवनात प्रारंभी त्यांनी काही काळ सरकारी नोकरी केली. नंतर टंकलेखक, छायाचित्रकार, जाहिरात लेखन, विमा कंपनीचे प्रचारक, नाटय.कंपनीचे चालक अशा विविध भूमिका निभावल्या. खंदा पत्रकार, घणाघाती लेखक, समाजसुधारक, इतिहासकार, पुरोगामी चळवळींचा मार्गदर्शक अशा अनेक नात्यांनी त्यांनी महत्त्वाची कामगिरी केली.

राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, लोकहितवादी, आगरकर ही त्यांची प्रेरणास्थाने होती. शाहू महाराजांच्या ब्राह्मणेतर चळवळीचे ते पुरस्कर्ते होते. प्रबोधनकार ठाकरे समतेच्या विचारांचे, सामाजिक न्यायाचे कट्टर पुरस्कर्ते होते. सत्यशोधक समाजाची तळपती तलवार म्हणूनही ते ओळखले जात. खरा ब्राह्मण, विधिनिषेध, टाकलेले पोर ही नाटके, माझी जीवनगाथा हे आत्मचरित्र यासह त्यांनी कुमारिकांचे शाप, भिक्षुकशाहीचे बंड, प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापुजी, ग्रामण्याचा साद्यंत इतिहास, हिंदूवी स्वराज्याचा खून, कोदंडाचा टणत्कार, रायगड, संत गाडगेबाबा, पंडिता रमाबाई, संत रामदास, जुन्या आठवणी आदी अनेक पुस्तके लिहिली. धारदार लेखणी आणि तडफदार वाणी ही त्यांची वैशिष्ट्ये. होती. सारथी, लोकहितवादी, प्रबोधन यांसारखी काही नियतकालिके त्यांनी काढली. प्रबोधनमधून सामाजिक व धार्मिक अन्यायाविरुद्ध, गुलामगिरीविरुद्ध घणाघाती लेखन केले. प्रबोधनाच्या या भूमिकेमुळे त्यांना प्रबोधनकार हे सन्मानाचे बिरुद मिळाले.

प्रबोधनकार ठाकरे यांच्या धारदार लेखणीने आणि तडफदार वाणीने अनेकांचे वस्त्रहरण झाले. धर्म, रूढी, परंपरा, श्रद्धा यांच्या नावावर चुकीचे विचार लादून बहुजन समाजाला फसवणाऱ्या ठकांविरुद्ध त्यांनी तोफ डागली. अंधश्रद्धेपासून लोकशाहीपर्यंत विविध विषयांवर त्यांनी टोकदार मते मांडली. प्रस्थान या पुस्तकात ते स्वातंत्र्याविषयी म्हणतात, सामाजिक व धार्मिक गुलामगिरीत कडक सीलबंद ठेवून राजकीय स्वातंत्र्य मिळवण्याची शेखी मारणारे लोक एक तर मूर्ख असले पाहिजेत अथवा अट्टल लुच्चे असले पाहिजेत. यापेक्षा तिसरी भावना संभवत नाही. या एकाच वाक्याने त्यांची सामाजिक- धार्मिक सुधारणांविषयीची आग्रही भूमिका ध्यानात येते. सामाजिक क्रांतीशिवाय राजकीय क्रांती फोल आहे, असे ते म्हणत. १९२३ साली प्रबोधनमध्ये त्यांनी धर्माचा बाप मनुष्य या नावाचा एक लेख लिहिला होता. त्यात ते म्हणतात, धर्माने मनुष्य निर्माण केलेला नाही मनुष्याने धमार्ला जन्म दिलेला आहे. अर्थात धर्माचे कर्तव्य मनुष्याच्या हाती आहे. धमार्ला वाटेल ते वळण देण्याचा अधिकार मनुष्याच्या हाती आहे. धमार्ला मनुष्यावर अरेरावी गाजवता येणार नाही. देवळांचा धर्म आणि धमार्ची देवळे या पुस्तकात त्यांनी म्हटले आहे, भारतात धार्मिक गुलामगिरीच्या थोतांडात देवळांचा नंबर पहिला लागतो. देवळाची उत्पत्ती ब्रह्मदेवाच्या बारशाला खास झालेली नाही. हिंदू धमार्ची ती अगदी अलीकडची कमाई आहे. देऊळ हा देवालय या शब्दाचा अपभ्रंश आहे. देवाचे जे आलय म्हणजे देवालय. देवाचे वसतिस्थान ते देवालय. आमचे तत्त्वज्ञान पाहावे तर देव चराचराला व्यापून आणखी वर दशांगुळे उरला आहे. अशा सर्वव्यापी देवाला चार भिंतींच्या आणि कळसबाज घुमटांच्या घरात येऊन राहण्याची जरूरच काय पडली होती? पुढे ते म्हणतात, बौद्ध धर्म हिंदूस्थानातून परागंदा होईपर्यंत तरी (म्हणजे इसवीसनाचा उदय होईपर्यंत तरी) भारतीय इतिहासात देवळांचा कोठेच काही सुगावा लागत नाही. मग तोपर्यंत आमचे हिंदू देव थंडीवाऱ्यात कुडकुडत आणि उन्हातान्हात धडपडत पडले होते काय? अशी बिनतोड घणाघाती भाषा हे प्रबोधनकारांचे वैशिष्ट्य.होते.

प्रबोधनकार ठाकरे हे मानवी तत्त्वांचे उपासक होते. व्यक्तिपूजेपेक्षा विचारपूजा त्यांना फार महत्त्वाची वाटत असे. त्यांनी आपल्या जीवनात विभूतीपूजा, ग्रंथप्रामाण्य यांना काडीमात्रही स्थान दिले नाही. त्यांनी १ नोव्हेंबर १९२२ च्या प्रबोधनच्या अंकात लिहिले होते, निर्मळ सत्य प्रतिपादनाच्या आड प्रत्यक्ष परमेश्वर आला तरी त्यालाही लाथ हाणून अप्रिय सत्याची तुतारी फुंकण्यात सत्यवादी वीर कधीच मागेपुढे पाहत नाही. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रबोधनकारांच्या एकसष्टीच्या समारंभात म्हटले होते की, रयत शिक्षण संस्थेची कल्पना माझी असली तरी त्या बीजाला चैतन्याचे, स्फूतीर्चे नि उत्साहाचे पाणी घालून त्याला अंकुर फोडणारे आणि सुरुवातीला संकटाच्या प्रसंगी धीर देऊन विरोधाचे पर्वत तुडवण्याचा मार्ग दाखवणारे माझे गुरू फक्त प्रबोधनकार ठाकरे आहेत. ते माझे गुरू तर खरेच पण मी त्यांना वडिलांप्रमाणे पूज्य मानतो. का मानू नये? मी एका प्रसंगी निराशेच्या आणि संतापाच्या भरात असताना चित्त्यासारखी उडी घेऊन ठाकरे यांनी माज्या हाताची बंदूक हिसकावून घेऊन माझे डोके ठिकाणावर आणले नसते तर कुठे होता आज भाऊराव आणि त्याचा कायार्चा पसारा?

ग्रामण्याचा साद्यंत इतिहास या ग्रंथात ते म्हणतात, दिव्याच्या उजेडाच्या इतिहासाबरोबरच त्याच्या अंधाराचाही इतिहास पुढे आला पाहिजे. नाहीतर आमच्या इतिहासाचे एक अंग अर्धांगवायूने लुळे पडलेले आहे. इतके तरी उघडपणे संकोच न धरता शिरोभागी नमूद करून ठेवले पाहिजे. मग असला लुळापांगळा एकांगी इतिहास असला काय आणि नसला काय सारखाच. चांगल्या गोष्टींपेक्षा वाईट गोष्टी मनावर विशेष परिणाम करतात. कॉमेडीपेक्षा ट्रॅजिडीच जास्त परिणामकारक होते. आपल्या राष्ट्रीय इतिहासातील चांगला भाग अधिकाधिक उज्ज्वल करणे जसे आपले कर्तव्य आहे त्याचप्रमाणे त्यातले वाईट भाग आपल्या प्रत्यक्ष वर्तनाने सुधारून त्याऐवजी सत्कृत्यांची भर घालणे हेही आपले अनिवार्य कर्तव्यच आहे. राष्ट्राचा किंवा समाजाचा इतिहास सर्वांगसुंदर करण्याचा हाच एक मार्ग आहे. दोष लपवून सद्गुणांचाच नेहमी पाढा वाचणे हा नव्हे. गतकाळातील सामाजिक किंवा राजकीय पातकांना चव्हाटयावर आणण्याचे नीतिधैर्य ज्या राष्ट्राला नाही, त्याने आजन्म सुधारक राष्ट्राच्या कोपरखळया खातच कोठेतरी कानाकोपऱ्यात पडून राहिले पाहिजे. प्रबोधनकार ठाकरे यांनी वर्णाश्रम व्यवस्था, जातीव्यवस्था, स्त्री-पुरुष समानता, धर्म, धर्मद्वेश, अंधश्रद्धा, शिक्षण, सामाजिक न्याय व नैतिकता, श्रमांचे महत्त्व आणि प्रतिष्ठा, शेती आणि शेतकरी, व्यक्तिपूजा की विचारपूजा, लोकभाषा, लोकराज्य, लोकशाही, ज्योतिषाची भोंदूगिरी अशा अनेक विषयांवर मूलभूत स्वरूपाचे टोकदार लेखन केले आहे. त्यांच्या लेखनात बुद्धिप्रमाण्यवाद दिसून येतो. सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रत्येकाने प्रबोधनकार ठाकरे यांचे समग्र लेखन वाचण्याची आणि त्यापासून प्रेरणा घेण्याची, त्यांचा विवेकवाद स्वीकारण्याची आज नितांत गरज आहे. महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेतील या बुद्धिप्रामाण्यवादी निर्भीड प्रबोधकाला विनम्र अभिवादन..

# भंगु दे काठिन्य त्यांचे..

जर्मनीची 'सॉफ्ट पॉवर' ठरलेलं एक पंचवार्षिक कलाप्रदर्शन म्हणजे 'डॉक्युमेण्टा'. त्याच्या निवड समितीचा राजीनामा कवी रणजित होस्कोटे यांनी दिल्यामुळे उठलेलं वादळ कुठे जाणार आहे? त्यापेक्षाही, कलाप्रेमींच्या अपेक्षांचं काय होणार आहे? -तपशील देणारी आणि शक्यता सांगणारी ही नोंद.. कासेल हे जर्मनीतलं तसं लहानसं गाव. विमानतळही नाही इथं. पण दर पाच वर्षांनी 'डॉक्युमेण्टा' या कला-प्रदर्शनासाठी इथं गेल्या पाच-सहा खेपांना तर जगभरातून दहा लाख प्रेक्षक आले. मी पहिल्यांदा तिथं गेलो ती होती 'डॉक्युमेण्टा'ची बारावी खेप. सन २००७. मग २०१२ आणि २०१७ मधल्या तेराव्या, चौदाव्या खेपेलाही गेलो. कासेल शहरातलं, दुसऱ्या महायुद्धातल्या बॉम्बफेकीनं उद्ध्वस्त झालेलं 'फ्रीडरिशानम' हे संग्रहालय १९५५ च्या पहिल्या खेपेपासून 'डॉक्युमेण्टा'चं मुख्य स्थळ असतं. तिथंच सुरुवातीला गेलो.. तर त्या संग्रहालयाच्या समोरच्या अख्ख्या मैदानात लाल आणि जांभळ्या फुलांचा मळा फुलला होता गच्च. हे मुद्दाम कुणीतरी केलंय, पण काय आहे हे.. समोरचा फलक सांगत होता, 'पॉपी फील्ड'- म्हणजे ज्यापासून अफू बनते त्या फुलांचं शेत! पण हा अफूचा मळा एकटा नव्हता.. त्यातून चालायला आखीव वाटा होत्या आणि त्या वाटांवर गाणी ऐकू येत होती.. अफूच्या आहारी गेलेल्या कुणा पाश्चात्त्य रॉकस्टारांची नव्हेत, अफगाण महिलांनी गायलेली स्त्रीगीतं. अमेरिकाप्रणीत फौजांनी जे अफगाणिस्तान व्यापून टाकण्याचा प्रयत्न २००७ पर्यंत 'यशस्वी' केला होता, तिथल्या तालिबानांकडे अफूचा पैसा येतच राहिला होता आणि महिलांची गाणी बदलणार नव्हती.. हे पुढं अक्षरशः खरं ठरवणारी कलाकृती म्हणजे 'पॉपी फील्ड'! 'कला म्हणजे भावनांची आगळीवेगळी अभिव्यक्ती' म्हणतो ना आपण? मग कुणा सान्या इव्हेकोविच नावाच्या दृश्यकलावतीनं तिच्या भावनाच या कलाकृतीत अभिव्यक्त केल्या होत्या.. त्याही आगळेपणानंच. फक्त त्या तिच्या राजकीय भावना होत्या, इतकंच. कलाकाराला जगाबद्दल जे वाटत असतं, ते अभ्यासक वा विद्वानांसारखं बुद्धिनिष्ठ नसेल- कलाकाराच्या भावनाच असतील त्या- पण त्या सच्च्या असतील तर कलाकृती खरी ठरते ना! अशा राजकीय भावना, सामाजिक भावना, मानवतावादी भावनांच्या कलाकृतींची संगती त्या बाराव्या खेपेच्या डॉक्युमेण्टात होती.

किंवा तेराव्या खेपेच्या डॉक्युमेण्टामध्ये, त्या खेपेच्या आर्टिस्टिक डायरेक्टर- म्हणजे प्रदर्शनाच्या प्रमुख गुंफणकार - कॅरोलीन ख्रिस्टोफ वकार्गीव्ह यांनी फ्रीडरिशानम संग्रहालयाच्या मध्यभागी काही वस्तू मांडल्या होत्या. वरवर पाहता असंबद्ध. पण नंतर संबंध लागणाऱ्या अशा त्या वस्तूंमध्ये हिटलरच्या प्रेयसीनं वापरलेली चांदीची साबणदाणी आणि टॉवेल होता, इटलीत फॅसिस्ट मुसोलिनीच्या कैदेत राहावं लागलेला आणि पुढं थोर स्थिरचित्रकार म्हणून ओळखला गेलेला जॉर्जिओ मोरान्दी यानं कैदेत असताना केलेली चित्रं होती, तसंच एका अफगाण चित्रकारानं जी अनेक अफगाण चित्रकारांची जी चित्रं तालिबान्यांपासून वाचवली, तीही इथं होती. जवळपासच्या एका खोलीच्या भिंती अगदी छोटया आकाराच्या चित्रांनी भरल्या होत्या.. ही सर्व चित्रं सफरचंदांचीच. हिटलरी छळछावणीत एका ख्रिस्ती (ज्यू नाही) धर्मगुरूलाही डांबण्यात आलं होतं. कॉर्बिनिअन आइग्नर हे त्याचं नाव. धर्मकारणाप्रमाणे बागकामातही त्याला रस होता, पण हिटलरी राजकारणाला त्यानं खुला विरोध केला. छावणीत रवानगी होऊनही, तो अशुद्ध रक्ताचा किंवा शत्रुवंशाचा नसल्यामुळे त्याला जगता आलं.. त्या जिवंत-नरकवासाच्या काळात त्यानं ऐन छावणीतच सफरचंदाच्या तीन नव्या जाती तयार केल्या! त्यानं केलेल्या या सफरचंदांच्या चित्र-नोंदी होत्या. तेराव्या खेपेच्या डॉक्युमेण्टातला त्या असंबद्ध वस्तूंपासून ते सफरचंदी चित्र-नोंदींपर्यंतचा हा भाग प्रेक्षकाला सजग करत होता.. कलावंताच्या मृत्यूनंतरही कला जपली पाहिजेच.. पण कला म्हणून काय जपायचंय? कोणती मूल्यं जपायचीत?

मग चौदाव्या - २०१७ च्या खेपेपर्यंत अनेक देशांतलं राजकारण भलत्या वळणावर गेलं होतं. ट्रम्प यांचा २०१६ मधला विजय, ही त्या भलत्या वळणाची मोठी खूण ठरली होती. अशा काळात कलेचं काय होणार, हाच प्रश्न रास्त.. त्यावर सणसणीत उत्तर त्या खेपेच्या डॉक्युमेण्टाचे प्रमुख गुंफणकार ॲडॅम शिमचिक यांनी दिलं - कळकळ असेल, तर कलावंताकडून निर्मिती होतच असते. ती छान दिसते की नाही, किंवा तिचा दर्जा कसा आहे, याचं मोजमाप करण्यापेक्षा कळकळ होती की नव्हती, हे महत्त्वाचं ठरेल. डॉक्युमेण्टा-१४तल्या अनेक कलाकृतींनी हे उत्तर ठसवलं होतं. कुठेतरी कोलंबियात राहून चित्रं रंगवणारी, १०० हून अधिक चित्रं घरात साठून होती तीही चिखलाच्या पुरानं भिजल्यावर हताश न होता चिखलालाच चित्रांमध्ये स्थान देणारी मूळची स्विस चित्रकर्ती, हे अधिक लक्षात राहिलेलं उदाहरण. पण अशी अनेक उदाहरणं होती.

कासेलचा डॉक्युमेण्टा हा कलेकडे पाहण्याची दृष्टी देणारा आणि या दृष्टीला कालसुसंगत करणारा विचारउत्सव असतो. दृश्यकला आणि विचार यांचं नातं अभेद्य असल्याचा विश्वास ज्यांना असतो, असे जगभरातले अनेकजण पदरमोड करून डॉक्युमेण्टा अनुभवायला कासेलमध्ये येतात. ही पदरमोड मला गेल्या वर्षीच्या (२०२२) पंधराव्या डॉक्युमेण्टाच्या वेळी जमली नाही, पण पुढल्या (२०२७ सालच्या) डॉक्युमेण्टाकडून आशा वाढल्या होत्या.. याचं एक कारण म्हणजे मुंबईचा कलासमीक्षक, कवी आणि तत्त्वचिंतक रणजित होस्कोटे याचा समावेश सोळाव्या खेपेसाठी प्रमुख गुंफणकार कोण असावेत, हे ठरवणाऱ्या निवड समितीवर झाल्याची बातमी गेल्या जूनमध्ये आली होती.



होस्कोटे यांचा राजीनामा

या मथळ्याची बातमी मात्र भारतात बलिप्रतिपदेला आली. त्या दिवशी महाराष्ट्रातली वृत्तपत्रं बंद होती, बातमी इंटरनेटवरूनच आली.. रणजितनं पाठवलेलं राजीनामा-पत्र ई-फ्लक्स या कलाविषयक महाजाल-नियतकालिकानं जसंच्या तसं लोकांपर्यंत पोहोचवलं. मग रणजित आणि त्याची सहचरी नॅन्सी अदजानिया यांच्याशी संपर्क साधायचा प्रयत्न केला.. ते व्हँकूव्हरमध्ये असल्याचं कळलं. पण त्याआधीच जर्मनीतल्या आणि युरोपातल्या, मग भारतातल्याही वृत्तपत्रांनी रणजित होस्कोटेंच्या राजीनाम्याचं गांभीर्य जाणणाऱ्या बातम्या दिल्या होत्या.

गांभीर्य अनेक कारणांसाठी आहे. एकतर रणजितवर ज्यूद्वेष्टा असल्याचा शिक्का मारणं- त्यातही भारतातल्या इस्त्रायली वाणिज्य-दूतावासाच्या एका कार्यक्रमाबद्दल रणजितनं निषेध नोंदवला आणि वैचारिक विरोध केला, म्हणून रणजितला थेट ज्यूद्वेष्टा ठरवणं, हे एकतर बेअक्कलपणाचं किंवा ज्या रेमेडोकेपणाची भलामण राजकीय चातुर्य अशी केली जाते तसल्या चातुयार्चं लक्षण आहे.

# आंघोळ करताना या गोष्टींचा वापर कराल तर त्वचेच्या विकारांपासून होईल सुटका

**ऑ**फिसला जाण्याच्या गडबडीत सगळ्यांनाच साग्रसंगीत आंघोळ करायला मिळतेच असे नाही.त्यामुळेच कावळ्याची आंघोळ करुनच कित्येकांना घराबाहेर पडावे लागते. या सगळ्या घाईमुळे शरीर स्वच्छ होतेच असे नाही. अशा वेळी शरीर स्वच्छ करण्यासाठी जर तुम्ही तुमच्या आंघोळीच्या पाण्यात काही गोष्टी घातल्या आणि आंघोळ केली तर तुम्हाला त्वचेसंदभार्तील कोणतेही विकार होणार नाहीत. या अशा गोष्टी आहेत ज्या घरात अगदी सहज उपलब्ध असतात. त्यांचा वापर करुन तुम्हाला फ्रेश तर वाटेलच शिवाय तुम्हाला तुमची त्वचा चमकदार, कोमल आणि स्वच्छ वाटेल.

**लिंबू**

व्हिटॅमिन सी ने युक्त असलेल्या लिंबाचे भरपूर फायदे आहे. अगदी चेहऱ्यापासून ते पचनापर्यंतच्या अनेक समस्यांसाठी लिंबाचे सेवन केले जाते. तुमच्या त्वचेसाठीही लिंबू चांगला आहे. लिंबामध्ये असलेले ब्लिचींग एजंट तुमच्या त्वचेवरील घाण, अतिरिक्त मळ काढून टाकते. शिवाय तुमचे टॅनिंगही कमी करते. जर तुम्ही रोजच कोमट पाण्याने आंघोळ करत असाल तर तुम्ही तुमच्या पाण्यामध्ये अर्धं लिंबू पिळायला काहीच हरकत नाही. लिंबाच्या रसामुळे तुमच्या शरीरावरील मळ, चिकटपणा निघून जातो. तुम्हाला फ्रेशसुद्धा वाटते. या शिवाय त्वचेसंदर्भातील अन्य त्रासही दूर होतात जर तुम्हाला सकाळी वेळ नसेल तर घरी आल्यानंतर झोपण्याआधी आंघोळ करताना त्यात लिंबू पिळा. सकाळीही अगदी काहीच सेंकदात तुम्ही लिंबू पिळून त्या पाण्याने आंघोळ करु शकता.

**खडे मीठ**

जर तुम्हाला दिवसभरात आलेला थकवा घालवायचा असेल. तर खडे मीठ तुमच्यासाठी अगदी परफेक्ट आहे. खडे मीठ घातलेल्या पाण्यात आंघोळ केल्यामुळे तुम्हाला रिलॅक्स वाटते. ताणतणाव दूर होते. अंगदुखी बंद होते. या शिवाय मीठामुळे त्वचा मुलायम होते. त्यामुळे तुम्हाला ऑफिसमधून घरी आल्यानंतर अशाप्रकारे आंघोळ करायला काहीच हरकत नाही. गरम पाण्यात साधारण अर्धा ते १ चमचा मीठ घालून मीठ विरघळू द्या. या पाण्याने आंघोळ करा. शक्य असेल तर या पाण्यात काही वेळ बसलात तरी काहीच हरकत नाही. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी हा प्रयोग करुन पाहा.

**आलं**

जर तुम्हाला सर्दी, ताप असा काही त्रास असेल तर तुम्ही आवर्जून आल्याच्या पाण्यात आंघोळ करायला हवी. आलं थोडसं ठेचून तुम्हाला तुमच्या आंघोळीच्या पाण्यात घालायचे आहेत. तुम्हाला लगेचच आराम पडेल. जर तुमची त्वचा नाजूक असेल तर तुम्ही आलं वापरणं टाळा. कारण आल्यामुळे तुमची त्वचा जळू शकते. अगदी लहानला तुकडा ठेचून तुम्ही पाण्यात घालणे अपेक्षित असते.

**ग्रीन टी**

ग्रीन टी चे भरपूर फायदे आहेत हे आपण जाणतोच. पण आंघोळीच्या पाण्यात तुम्ही ग्रीन टीचे पाऊच उघडून घातले तर तुमच्या त्वचेला त्याचा अधिक फायदा होईल. त्वचा टोन्ड करण्यासाठी ग्रीन टी ही उत्तम आहे. तुम्हाला तुमच्या आंघोळीच्या पाण्यात ग्रीन टी घालायची आहे. तुम्ही ग्रीन टी चे मिळणारे सॅशे उघडून टाकले तर तुमच्या पाण्यात तुम्हाला पान दिसतील. त्यापेक्षा तुम्ही ग्रीन टीचे मिळणारे डीप डीप पाऊच पाण्यात घालून आंघोळ करा. साधारण आठवडाभरानंतर तुम्हाला फरक जाणवेल.

**अँटिसेप्टीक लिक्वीड**

खूप लोकांना पाण्यात अँटिसेप्टिक लिक्विड घालून आंघोळ करायची सवय असते. तुम्हालाही बाहेरील धूळ मातीचा त्रास असेल किंवा तुम्हाला झटपट स्वच्छता हवी असेल तर तुम्ही तुमच्या पाण्यात अँटीसेप्टीक लिक्वीड घालू शकता. यामुळे तुमच्या शरीरावर कोणत्याही जखमा असतील तार त्यांच्यावरही हे अँटीसेप्टीक लिक्वीड चांगले काम करते. पूर्वी अनेक अँटीसेप्टीक लिक्वीड लहान मुलांच्या आंघोळीच्या पाण्यात टाकण्याचा सल्ला दिला जायचा. पण आता डॉक्टर अगदी तान्ह्या बाळांना हा सल्ला देत नाही. आता तुम्ही कावळ्याची आंघोळ करत असाल तरी शरीर अस्वच्छ राहण्याचे टेन्शन नाही. तुम्ही या वस्तूंचा वापर करुन स्वच्छ शरीरच नाही तर अन्य विकारांपासून मुक्ती मिळवू शकता.



# गुडघेदुखी टाळण्यासाठी...

**आ**युष्यभर चालणे, धावणे, उडी मारणे आणि उभे राहणे हे शरीरातील सर्वांत मोठ्या सांध्यामुळे शक्य होते ते म्हणजे गुडघ्याचे सांधे. आपण हालचाल करतो करताना ते लक्षणीय भार सहन करतात आणि या सांध्यातील एक छोटीशी समस्याही मोठी गैरसोय बनते. अनेकदा सांध्यातील वेदना हे वृद्धत्वाच्या लक्षणांपैकी एक मानली जाते, मात्र वयानुसार गुडघ्याच्या समस्या टाळता येण्यासाठी व आधीच गुडघेदुखीचा सामना करत असल्यास वेदना व्यवस्थापित करण्यासाठी तुम्ही काही करू शकता का? याचे उत्तर हो आहे. गुडघ्याच्या सांध्यामध्ये तुमची हाडे, टेंडन्स, स्नायू आणि अस्थिबंध एकत्रितपणे जटिल यंत्र तयार करतात, त्यामुळेच तुम्हाला जटिल हालचाली करता येतात. खालच्या पायातील हाडे (टिबिया) आणि मांडी (फेमर), नीकॅप (पॅटेला) यांचा मिळून गुडघ्याचा सांधा तयार होतो. या हाडांची टोके कार्टिलेजने झाकलेली असतात, जे लवचिक असते आणि धक्के शोषून घेऊन, हाडांचे रक्षण करते. टेंडन्स आणि अस्थिबंध हाडे आणि स्नायूंना जोडलेले असतात आणि सांधे एकत्र आणि स्थिर ठेवतात आणि हालचाल करण्यास मदत करतात. अनेक वेगवेगळ्या उती एकत्र येऊन सांधे तयार होतात आणि आपण हालचाल करताना हे ऊतक एकत्र हलतात व त्यावेळी त्यांच्यामध्ये घर्षण होते. हे घर्षण रोखण्यासाठी गुडघ्याभोवती मऊ उती आणि द्रवाने (सायनोव्हियल) बनलेली एक कॅप्सूल असते.

**वेदना कशामुळे होतात?**

आता आपल्याला गुडघ्याच्या सांध्याची रचना माहीत असल्याने या संरचनेत काय बदल झाल्यावर वेदना होतात, ते पाहू या. गुडघेदुखीचे सर्वांत मोठी कारणे दुखापत, फ्रॅक्चर, लिगामेंट फाटणे, टेंडन्स फाटणे, पाय मुरगळणे, अचानक वळणे, सांध्यावर जास्त भार येणे, पडणे किंवा ऑस्टिओपोरोसिससारखी परिस्थिती ही आहेत. बैठी जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव यामुळे चालताना किंवा धावताना सांध्यांना आधार आसलेले स्नायू कमकुवत बनू शकतात. योग्य पोषणाचा अभाव, कमी प्रमाणात ओमेगा ३ (जे सूज कमी करते किंवा थांबवते आणि सांध्याचे आणखी नुकसान टाळते.), व्हिटॅमिन ए, सी, के हे हाडांचे आणि कर्टिलेज पेशींचे संरक्षण करण्यास मदत करतात. हे जीवनसत्त्वे अँटिऑक्सिडंट्स म्हणून देखील कार्य करतात आणि मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करून सूज कमी करतात. सैल शरीर, जखमी किंवा तुटलेल्या हाडांचे तुकडे गुडघ्याच्या सांध्यामध्ये अडकणे, गुडघ्याची कॅप निखळणे, पाय किंवा नितंब दुखणे तुमच्या चालण्यावर परिणाम करतात.

# आहारातील कडधान्य आरोग्यासाठी उत्तम



**ब**ऱ्याचदा आहारात कडधान्य ही वापरली जातात. परंतु, लहान मुले असो किंवा मोठी माणसे असो. अनेकदा कडधान्याचे सेवन करण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे कडधान्यामध्ये असलेली जीवनसत्व आणि पोषकतत्वे मिळत नाही आणि त्याचा परिणाम मानवाच्या स्वास्थावर होताना दिसतो. मात्र, ही कडधान्य का खावी? त्याच्यात असे कोणते गुणधर्म आहेत? ज्यामुळे तुमचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. चला तर जाणून घेऊया कडधान्याचे आरोग्यदायी फायदे

**हरभरे**

हरभरे आणि हरभऱ्याची डाळ मानवी आरोग्यासह सौंदर्यास देखील उत्तम आहे. यात कार्बोहायड्रेट, प्रोटीन, कॅल्शियम, लोहयुक्त खनिज आणि व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. रक्तदाब, खोकला आणि कावीळ या आजारावर लाभदायी असून हरभऱ्याच्या डाळीचे पीठ केस आणि त्वचेच्या सौंदर्यावर गुणकारी असते. यामुळे त्वचा उजळण्यास मदत होते.

**उडीद**

उडदाची डाळ शरीरास थंड असते. उडदाच्या डाळीत कार्बोर्हायड्रेट, व्हिटॅमिन्स, कॅल्शियम व प्रोटीन भरपूर प्रमाणात आढळतात. मुळव्याध, दमा, पक्षाघात आदी आजार असलेल्यांनी त्यांच्या आहारात उडीद डाळीचा जास्त वापर केला पाहिजे. या आरोग्यास फायदा होतो.

**मूग**

शिजवलेले किंवा भिजवलेल्या मुगामध्ये भरपूर प्रमाणात पोषकतत्त्वे असून ते मानवास आरोग्यवर्धिनी असतात. कोंब आलेल्या मुगामध्ये कॅल्शियम, लोहयुक्त खनिज, प्रोटीन, कार्बोर्हायड्रेट व व्हिटॅमिन्स यांच्या मात्रा दुपटीने वाढतात. ताप आणि खोकला झालेल्या व्यक्तीसाठी ते लाभदायी असतात.

**तूरडाळ**

तूरडाळीत खनिज, कार्बोहायड्रेट, लोहयुक्त खनिज, कॅल्शियम यांचे योग्य प्रमाण असते. तसेच तूर डाळ ही पचण्यास उत्तम असते. त्यामुळे लहान बालकांना तूरडाळीचे पाणी पिण्यास देतात. तसेच आजारी व्यक्तीस तुरीच्या डाळीची खिचडी खाण्यास देतात. मात्र, दमा आणि वाताचे आजार असणाऱ्या व्यक्तींना तूरडाळीपासून त्रास होतो.

**मसूर**

मसूरच्या डाळीचा उपयोग रक्तशुद्धी तसेच रक्तवाढीसाठी होतो. जुलाब, खोकला आणि अपचन यावर मसूरची डाळ लाभदायी असते. तसेच मसूरच्या डाळीचे पीठ चेहऱ्याला लावल्याने चेहरा उजळतो.

# रात्री गाढ झोप मिळत नाही?



काही जणांचा वेळ रात्री उशिरापर्यंत मोबाइलवर जात असल्यानं त्यांची झोप पूर्ण होत नाही. तर काहींना तणावामुळे झोप येत नाही. पुरेशा प्रमाणात झोप न मिळाल्यास कित्येक गंभीर आजारांना आयते निमंत्रण मिळते. आजारांची लागण होऊ नये, यासाठी योग्य प्रमाणात झोप घेणे गरजेचं आहे. रात्री अंथरूणात गेल्यानंतर बऱ्याचदा झोप येत नसल्यानं तुम्ही वारंवार कुस बदलत राहा. या समस्येतून सुटका मिळवायची असल्यास एक खास पेय झोपण्यापूर्वी प्यायल्यास तुम्हाला झोप येण्यास मदत मिळेल. हे पेय झोपताना १५ मिनिटांपूर्वी प्यावे. यानंतर काही वेळानं तुम्हाला नक्कीच झोप येईल.

**खास पेयाचं नाव काय आहे?**

'डर्टी लेमन ड्रिंक' असं या पेयाचं नाव आहे. बऱ्याच जणांनी या पेयाचं नाव ऐकलेही असेल. हे पेय प्यायल्यानंतर झोप येण्यास मदत होते, याबाबतची माहिती खूपच लोकांना आहे. या ड्रिंकमध्ये लिंबूच्या रसाचा अधिक वापर केला जातो. संशोधनानुसार, लिंबूच्या रसाचं सेवन केल्यास चांगली झोपही येते आणि सोबतच ताणतणाव कमी होण्यासही मदत मिळते. या पेयामध्ये लिंबूव्यतिरिक्त अन्य साम्रगीचाही वापर केला जातो. ज्यामुळे अंथरूणात पडल्या-पडल्या आपल्याला झोप येते.

**'डर्टी लेमन ड्रिंक'मध्ये वापरली जाते 'ही' सामग्री?**

'डर्टी लेमन ड्रिंक'मध्ये लिंबू रसाव्यतिरिक्त अन्य सामग्रीचाही वापर केला जातो. या ड्रिंकमध्ये पाणी, ताज्या हळदीची पेस्ट, गुलाब पाणी, कॅमोमाईलचं फुलाचा वापर केला जातो. या साम्रगीचं मिश्रण करून हे ड्रिंक तयार केलं जातं. या पेयामुळे मानसिक शांतता मिळण्यास मदत होते आणि तुम्हाला झोप देखील येते.

**'डर्टी लेमन ड्रिंक'ची रेसिपी**

**सामग्री :** फिल्टर्ड पाणी, दोन लिंबू, ताज्या हळदीची पेस्ट, गुलाब पाणी, कॅमोमाईल फूल

**ड्रिंक तयार करण्याची पद्धत :** सर्वात आधी एका ग्लासमध्ये फिल्टर्ड पाणी घ्या. त्यामध्ये दोन चमचे लिंबूचा रस मिक्स करा. यानंतर गुलाब पाण्याचे पाच ते सहा थेंब मिक्स करा. हळदीची पेस्ट संपूर्ण मिश्रणात चांगल्या पद्धतीनं एकजीव करा. आता या मिश्रणामध्ये पाच मिनिटांसाठी कॅमोमाईलचं फूल ठेवून द्यावं. त्यानंतर ड्रिंक दुसऱ्या ग्लासमध्ये गाळून घ्या, ही झाली डर्टी लेमन ड्रिंकची रेसिपी.

**डर्टी लेमन ड्रिंक : झोपेसाठी कसं ठरतं फायदेशीर**

'डर्टी लेमन ड्रिंक' तयारी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सामग्रीमध्ये कित्येक औषधी गुणधर्म आहेत. ही औषधी गुणधर्म आपल्या आरोग्याला अतिशय फायदेशीर ठरतात. लिंबूमध्ये शरीर डिटॉक्स करण्यासह मनाला शांतताही देण्याचेही गुणधर्म आहेत. ज्यामुळे आपल्याला झोप येण्यास मदत होते. झोप येण्यासाठी आपल्या मेंदूतील पेशी सक्रिय करण्याचं काम गुलाब पाणी करते. हळदीतील गुणधर्मामुळे शरीर तणावमुक्त होते. झोपेसाठी कॅमोमाईलचं फूल अतिशय उपयुक्त मानलं जातं. या सर्व सामग्रीचा वापर करून 'डर्टी लेमन ड्रिंक' तयार केलं जातं. या ड्रिंकमुळे झोपेशी संबंधित सर्व समस्या दूर होऊन चांगली झोप येण्यास मदत मिळू शकते.

# डेली डाएटमधून इतक्या कॅलरी करा कमी...




**ज**र तुम्ही हेल्दी असाल आणि तरी सुद्धा तुम्हाला वजन कमी करायचं असेल किंवा फिट रहायचं असेल तर डेली डाएटमधून दररोज काही कॅलरी कमी करून तुम्ही वजन कमी करू शकता. तसेच कॅलरी कमी केल्याने तुमचं आरोग्यही चांगलं राहील. याआधी झालेल्या अनेक रिसर्चमधून ही बाब समोर आली आहे की, लो-कॅलरी डाएटचं सेवन करून आरोग्याशी संबंधित अनेकप्रकारच्या समस्या दूर होतात. अशात तुमचं वय वाढलं तरी तुम्ही तरूण दिसाल.

**डाएटमधून किती कॅलरी कमी कराव्या**

नुकत्याच झालेल्या एका नव्या रिसर्चमधून समोर आले आहे की, डेली डाएटमध्ये दररोज केवळ ३०० कॅलरी कमी करून शरीरात कलेस्ट्रॉलचं प्रमाण, ब्लड प्रेशरचं प्रमाण आणि ब्लड शुगरचं प्रमाण चांगलं होतं. सोबतच अनेकप्रकारच्या मेटाबॉलिज्मशी संबंधित आजार तुमच्या जवळही भटकणार नाहीत. केवळ वेट लॉस नाही तर आरोग्यही चांगलं राहतं द लॅंसेट डायबिटीस ॲन्ड इंडोक्रिनोलॉजी नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित या रिसर्चमध्ये या गोष्टीचं समर्थन करण्यात आले आहे की, कमी कॅलरीचं सेवन केल्याने केवळ वजन कमी होतं असं नाही तर तुमचं आरोग्यही चांगलं राहतं आणि शरीरात कॉम्प्लेक्स मेटाबॉलिक बदलही होत नाहीत. रिसर्चमध्ये ही गोष्ट सिद्ध करण्यात आली आहे की, जर तुम्ही तुमच्या दररोजच्या कॅलरी इनटेकमध्ये कमतरता आणाल तर याने ना केवळ वजनच कमी होईल तर डायबिटीस आणि हृदयाशी संबंधित धोकाही कमी होतो.

**२ वर्ष कॅलरी इनटेकमध्ये २५ टक्के घट**

या रिसर्चमध्ये अभ्यासकांनी २१ ते ५० वयोगटातील २०० महिला आणि पुरूषांची निवड केली आणि त्यांना दोन वेगवेगळ्या ग्रुपमध्ये विभागण्यात आले. एका ग्रुपला सांगण्यात आलं की, त्यांना २ वर्षांपर्यंत कॅलरी रिस्ट्रिक्शनची प्रॅक्टिस करायची आहे. या लोकांना सांगण्यात आले की, ते त्यांना हवं ते खाऊ शकतात. पण एक अट आहे. ती म्हणजे त्यांना त्यांच्या रोजच्या कॅलरी इनटेकमध्ये २५ टक्के घट करायची होती. तेच दुसऱ्या ग्रुपला सामान्य रूपाने खाणं-पिणं करण्यास सांगण्यात आलं.

**७१ टक्के लोकांचं वजन १० टक्के घटलं**


ज्या ग्रुपमधील लोकांना कॅलरी कमी करण्यास सांगण्यात आले होते, त्यांच्यातील जास्तीत जास्त लोक २५ टक्के कॅलरी करण्याचं टार्गेट पूर्ण करू शकले नाहीत आणि २ वर्षात त्यांनी सरासरी कॅलरीमध्ये ११.९ टक्के घट केली होती. जी दररोजच्या ३०० कॅलरीच्या बरोबरीत आहे. अभ्यासकांना आढळलं की, केवळ १ वर्षातच या ग्रुपमधील लोकांच्या कोलेस्ट्रॉल आणि ब्लड प्रेशरमध्ये कमतरता आढळली. सोबतच साधारण ७१ टक्के लोक त्यांचं वजन १० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात यशस्वी ठरले.

**प्रोसेस्ड फूड करा अव्हॉइड**

डाएटमध्ये हेल्दी करणे जसे की, फळ आणि भाज्यांचं जास्त सेवन करावं आणि प्रोसेस्ड फूड खाणं कमी करावं. हे दोन्ही प्रभावी उपाय आहेत. या माध्यमातून तुम्ही कॅलरी कमी करू शकता आणि हेल्दी राहू शकता.

## बोधकथा

# चल रे भोपळ्या टुणुक टुणुक



**ए**क होती म्हातारी. एकदा ती आपल्या लेकीकडे जायला निघाली. लेक रहायची दुसर्या गावाला. रस्त्यानं जाताना मधेच एक मोठे जंगल होत. म्हातारी काठी टेकत, टेकत रस्त्याने निघाली. वाटेत तिला भेटला कोल्हा. तो म्हणाला 'म्हातारे, म्हातारे, मी तुला खातो'.

पण म्हातारी हुषार होती. ती म्हणाली 'मला खाऊन तुझे पोट भरणार नाही. त्यापेक्षा थोडे दिवस थांब. लेकीकडे जाते , तूपरोटी खाते, लठ्ठ मुठ्ठ होते, मग मला खा.' कोल्ह्याला म्हातारीचे म्हणणे पटले.म्हातारी पुढे निघाली. तिला भेटला वाघ. तो म्हणाला 'म्हातारे, म्हातारे, मी तुला खातो'. त्याने डरकाळी फोडली. म्हातारी त्याला म्हणाली 'मला खाऊन तुझे पोट भरणार नाही.त्यापेक्षा थोडे दिवस थांब. लेकीकडे जाते , तूपरोटी खाते, लठ्ठमुठ्ठ होते, मग मला खा. ' वाघाची अशी समजूत काढून म्हातारी पुढे निघाली.लेकीकडे गेली .

ती खूप दिवस मजेत राहिली. खाऊन पिऊन लठ्ठमुठ्ठ झाली. थोडया दिवसांनी तिला वाटले की आपण आपल्या घरी जावे तेव्हा तिला आठवले की कोल्हा आणि वाघ आपल्याला खाणार आहे . तिने हे सर्व आपल्या लेकीला सांगितले मग लेकीने तिला जादूचा भोपळा दिला . आपल्या घरी परत येताना तिने एक मोठा लाल भोपळा घेतला. त्यात बसून ती भोपळ्याला म्हणाली ' चल रे भोपळ्या टुणुक टुणुक'. भोपळा रस्त्याने निघाला. वाटेत वाघाने भोपळा पाहिला. तो म्हणाला 'म्हातारे, म्हातारे थांब!' आतून म्हातारी म्हणाली 'कशाची म्हातारी आणि कशाची कोतारी. चल रे भोपळ्या टुणुक टुणुक'. त्याबरोबर भोपळा जोरात पळू लागला. थोडं पुढे गेल्यावर वाटेत कोल्हा भेटला. तो म्हणाला 'म्हातारे, म्हातारे थांब!' आतून म्हातारी म्हणाली 'कशाची म्हातारी आणि कशाची कोतारी. कोल्ह्यानेही भोपळ्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. पण म्हातारी आतून म्हणाली 'चल रे भोपळ्या टुणुक टुणुक!'. पुन्हा भोपळा जोरात पळू लागला. अशी होती म्हातारी हुषार. कोल्हा आणि वाघाच्या तावडीत ती काही सापडली नाही. भोपळ्यात बसून ती सुखरूप आपल्या घरी पोचली.

**तात्पर्य : शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ट.**


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898